# जिल्हा परिषद, नागपूर
**(ग्रामपंचायत विभाग)**
नविन ईमारत, रविभवन समोर, सिव्हील लाईन, नागपूर 440001
☎ 0712-2564203 Email Address :- dyceopanchayatnagpur@gmail.com


जिल्हा परिषद, नागपूर
आवक / जावक / शाखा
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
दिनांक: 25 / 11 / 2024
नियोजन
26/11/24
11437
स.प्र.अ. / उप.मु.का.अ.(सा.) / मु.का.

जावक क्रमांक:जिपना/पंचा/स्था-14/म.प्र.नि.मं. सुनावणी/ 5070 / 2024

**<u>अत्यंत महत्वाचे/जाहिर लोकसुनावणी दिनांक 12/12/2024</u>**

**प्रति,**

**गट विकास अधिकारी**
**पंचायत समिती रामटेक**

**विषय:-** मे.मॉईल लिमिटेड, मनसर, चारगाव, खैरी, परसोडा, कांद्री तहसिल रामटेक जिल्हा नागपूर यांनी 193.27 हेक्टर क्षेत्रफळात खाण पध्दतींचा वापर करून त्यांची उत्पादन क्षमता 89,992 टन प्रति वर्ष वरून 2,80,000 टन प्रति वर्ष पर्यंत विस्तारीकरण उत्पादन घेण्यासाठी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी बाबत.

**संदर्भ:-** उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, उप-प्रादेशिक कार्यालय-1, 5 वा माळा, उद्योग भवन, सिव्हील लाईन, नागपुर यांचे पत्र क्र.मप्रनि/उप्राकाना-1/718/2024 दिनांक 7/11/2024

उपरोक्त संदर्भिय विषयाचे अनुषगांने, मे.मॉईल लिमिटेड, मनसर, चारगाव, खैरी, परसोडा, कांद्री तहसिल रामटेक जिल्हा नागपूर यांनी 193.27 हेक्टर क्षेत्रफळात खाण पध्दतींचा वापर करून त्यांची उत्पादन क्षमता 89,992 टन प्रति वर्ष वरून 2,80,000 टन प्रति वर्ष पर्यंत विस्तारीकरण उत्पादन घेण्यासाठी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी करिता प्रस्ताव महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे सादर झालेला आहे. सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरण विषयक सुचना, विचार, टिका, टिप्पणी तसेच आक्षेप नोंदविण्यासाठी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी दिनांक 12/12/2024 रोजी सकाळी 11.30 वाजता प्रकल्पाचे स्थळ मे.मॉईल लिमिटेड, मनसर, चारगाव, खैरी, परसोडा, कांद्री तहसिल रामटेक जिल्हा नागपूर येथे आयोजित करण्यात आलेली आहे.

सदर प्रकल्पासबंधी प्रकल्पधारकाकडुन कार्यकारी सारांश (ईग्रंजी व मराठी), EIA, EMP अहवाल, वर्तमानपत्र जाहिरात प्रत व सि.डी. संदर्भिय पत्रान्वये प्राप्त झालेले असुन या कार्यालयाकडे अवलोकनार्थ उपलब्ध आहे. सुनावणीचे अनुषगांने उपरोक्त प्रस्तावित कंपनीच्या परिसरातील रहिवाशी, पर्यावरण विषयी काम करणा-या संस्था, सदर प्रकल्पामुळे वा अन्यप्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सुचना, विचार, टिका, टिप्पणी, आक्षेप तोंडी किंवा लेखी स्वरुपात जाहिर सुनावणी दरम्यान नोंदविता येईल.

विषयाकिंत प्रकरणी संदर्भिय विषयाचे अनुषंगाने आपणांस निर्देशीत करण्यात येते की, <u>नियोजीत पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीची योग्य प्रसिध्दी आपल्या कार्यालयाकडुन तसेच संबंधित ग्रामपंचायतीकडुन करण्याबाबत संबंधितांना आपल्या स्तरावरुन कार्यवाहीसाठी निर्देश देण्यात यावेत.</u> संदर्भिय पत्र यासोबत पाठविण्यात येत असुन त्याबाबत संबंधित ग्रामपंचायतीला कळविण्यात येवून केलेल्या कार्यवाहीचा प्रसिध्दी अहवाल उलट टपाली या कार्यालयास सादर करावा यास प्रथम प्राधान्य दयावे. करीता माहितीस व यथाशिघ्र कार्यवाहीस अग्रेषित.

**सहपत्र:-** संदर्भिय पत्र व जाहिरातीची छायांकित प्रत.

-सही-
(कपीलनाथ कलोडे)
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.प.)**
**जिल्हा परिषद नागपूर**

**प्रतिलिपी:-**

1) मा.जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर यांना माहितीस सविनय सादर.
2) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांना माहीतीस सविनस सादर.
3) मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि-नियोजन कक्ष), जिल्हा परिषद नागपुर यांना माहितीस तथा उपरोक्त पत्र व संदर्भिय पत्र जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यासंबंधाने कार्यवाहीस समादराने सादर.
4) उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, उप-प्रादेशिक कार्यालय-1, 5 वा माळा, उद्योग भवन, सिव्हील लाईन, नागपुर यांना विषयाकिंत प्रकरणी माहितीस सादर.

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.प.)**
**जिल्हा परिषद नागपूर**

592
11/11/24

# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

दूरध्वनी क्र. ०७१२-२५६०८५२
फॅक्स क्र. ०७१२-२५६०८५१
इ-मेल-sronagpur1@mpcb.gov.in

उप-प्रादेशिक कार्यालय-१,
५ वा माळा, उद्योग भवन,
सिव्हिल लाईन्स, नागपूर.

"आपली सेवा आमचे कर्तव्य"

जा.क्र. मप्रनि/उप्राकाना-१/ ५९८/२०२४

दिनांक :- ०६/११/२०२४

पंचायत विभाग जि. प. नागपूर
श्री. 4914 ८ नोव 2024
उप मु.का.अ. (ग्रा.प)
सहा. ग.वि.अ.

प्रति,

१. जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर
२. जिल्हा उद्योग केंद्र, नागपूर
३. जिल्हा परिषद, नागपूर
४. उप-विभागीय अधिकारी, रामटेक, जि.नागपूर
५. तहसिल कार्यालय, रामटेक, ता. रामटेक जि.नागपूर
६. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, ५ वा माळा, उद्योग भवन, सिव्हिल लाईन्स, नागपूर.
७. पर्यावरण विभाग, नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२.
८. मप्रनि मंडळ (मुख्यालय), सायन सर्कल, सायन (पुर्व), मुंबई-२२.
९. मुख्याधिकारी, नगर परिषद, रामटेक, जि.नागपूर.
१०. ग्रामपंचायत कार्यालय, मनसर, ता. रामटेक, जि.नागपूर
११. ग्रामपंचायत कार्यालय, चारगाव, ता. रामटेक, जि.नागपूर
१२. ग्रामपंचायत कार्यालय, खैरी, ता. रामटेक, जि.नागपूर
१३. ग्रामपंचायत कार्यालय, परसोडा, ता. रामटेक, जि.नागपूर
१४. ग्रामपंचायत कार्यालय, कांद्री, ता. रामटेक, जि.नागपूर

जिल्हा परिषद, नागपूर
आवक / जावक / शाखा
दिनांक 08/11/2024
क्रमांक 11082
पंचायत
प्र.अ. / उप.मु.का.अ.(सा.) / मु...

विषय :- मे. मॉईल लिमिटेड, मनसर, चारगाव, खैरी, परसोडा, कांद्री, तहसील — रामटेक, जिल्हा-नागपूर यांनी १९३.२७ हेक्टर क्षेत्रफळात खाण पद्धतींचा वापर करून त्यांची उत्पादन क्षमता ८९९९२ टन प्रति वर्ष वरून २,८०,००० टन प्रति वर्ष पर्यंत विस्तारीकरण उत्पादन घेण्यासाठी पर्यावरण विषयकजाहिर लोकसुनावणी बाबत.

महोदय,

मे. मॉईल लिमिटेड, मनसर, चारगाव, खैरी, परसोडा, कांद्री, तह. रामटेक, जि. नागपुर यांच्या प्रस्तावित खाण क्षेत्रफळ १९३.२७ हेक्टर मध्ये, खाण पद्धतींचा वापर करून त्यांची उत्पादन क्षमता ८९९९२ टन प्रति वर्ष वरून २,८०,००० टन प्रति वर्ष पर्यंत विस्तारीकरण उत्पादन घेण्यासाठी पर्यावरण विषयकजाहिर लोकसुनावणी बाबत. प्रस्ताव महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे सादर झालेला आहे. सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरण विषयक सुचना, विचार, टिका, टिप्पणी तसेच आक्षेप नोंदविण्यासाठी जाहिर लोकसुनावणीचे आयोजन करण्यात येत आहे. सदर सुनावणी **दि. १२/१२/२०२४ रोजी सकाळी ११:३० वाजता, प्रकल्पाचे स्थळ मे.** मॉईल लिमिटेड, मनसर, चारगाव, खैरी, परसोडा, कांद्री, तह. रामटेक, जि. नागपुर येथे होणार असून सदर प्रकल्पाच्या परिसरातील रहिवाशी, पर्यावरण विषयी काम करणाऱ्या संस्था, सदर प्रकल्पामुळे वा अन्यप्रकारे प्रभावीत होणारे रहिवाशी यांना सदर प्रकल्पासंबंधी सुचना, विचार, टिका, टिप्पणी, आक्षेप, तोंडी किंवा लेखी स्वरूपात नोंदवता येतील. याबाबत दि. **११/११/२०२४** रोजी **दैनिक इंग्रजी वृत्तपत्र द टाइम्स ऑफ इंडिया, नागपूर व मराठी दैनिक वृत्तपत्र लोकमत, नागपूर** मध्ये जाहीर सूचना प्रकाशित केलेली आहे. त्याची प्रत सोबत जोडत आहे.

सदर प्रकल्पाविषयी लोकांना माहिती उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्यासाठी सदर प्रकल्पासंबंधी तसेच पर्यावरण मुल्यांकन अहवालासंबंधी माहिती असलेले कार्यकारी सारांशाची मराठी व इंग्रजीमधील, तसेच पर्यावरण मुल्यांकन अहवालाचा मसुदा व इतर कागदपत्रे सोबत जोडलेले आहे. तरी या लोकसुनावणीची योग्य प्रसिध्दी आपले कार्यालयातर्फे करावी, तसेच परिसरातील नागरीकांना उपरोक्त कागदपत्रे कार्यालयीन वेळेत अभ्यासण्यासाठी उपलब्ध करून द्यावी, ही विनंती.

सोबत :- वरीलप्रमाणे.

आपला विश्वासु,

(राजेंद्र पाटील)
उप-प्रादेशिक अधिकारी, नागपूर-१.

प्रत सादर:- प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर.